


ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

# VIDYAWARTA

*Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

## Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College

**Interdisciplinary National Conference on**

## Recent Trends in Social Sciences & Commerce

27th February 2018



## PUBLIC ADMINISTRATION & POLITICAL SCIENCE

Organizer
Dr. S. R. Nimbore
Principal

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

**Arts, Commerce & Science College, Ashti, Dist.Beed**

Accredited by NAAC $B^{++}$ Grade with 2.78 CGPA, ISO 9001:2015, Green Audited College

**Organized by**

# One Day Interdisciplinary National Conference on

# Recent Trends in Social Sciences and Commerce

**Tuesday, $27^{th}$ February, 2018**

**Principal & Organizer**

Dr. S.R. Nimbore

**Convenors**

Dr. B.S. Waghmare

Prof. R.E. Bharudkar

**Published By**

**Harshwardhan Publication Pvt. Ltd.**

**Limbaganesh, Dist.Beed**

| | | | |
|---|---|---|---|
| 48 | Panchayat Raj Institution in India | Dr. Jayram S. Dhawale | 160 |
| 49 | Women And Panchyat Raj Institution | Dr. Suhas R. Morale<br>Mr. Pakkapon Jantaraoj | 164 |
| 50 | Political Development and Modernization | Dr. Vinod V. Bairagi | 167 |
| 51 | Indian's foreign policy and diplomacy with Different Countries for National Interest | Shaikh Gafoor Ahmed | 180 |
| 52 | Women Empowerment | Ranee Jagannathrao Jadhav | 185 |
| 53 | Human Right and Type | Shivaji Gorakshanath Dhokane | 188 |
| 54 | Human Rights in Indian Constitution | Dr. R. K. Kale | 192 |
| 55 | Marginal Status Of Women And Need Of Empowerment - A Review | Prof AnujaA.Kastikar<br>Dr. SangeetaS.Sasane198 | 196 |
| 56 | Womens Human Rights & Women Empowerment | Dr. S.N. Satale | 199 |
| 57 | भारतीय राज्यघटना आणी मानवी हक्क | प्रा.डॉ गालफाडे ए.बी. | 202 |
| 58 | मानवी हक्क आणि जागतीक शांतता | प्रा. डॉ. ढोबळे डी. बी. | 205 |
| 59 | पंडित नेहरूंचे अण्वस्त्र धोरण | प्रा.डॉ.माधव कदम | 208 |
| 60 | महिला सबळीकरणामध्ये प्रशासनाची भूमिका | डॉ. नामानंद गौतम साठे | 214 |
| 61 | जी एस टी (वस्तु व सेवा कर) आणि राज्या समोरील अव्हाने | डॉ.साहेब साठेड<br>गणेश मारोती कचरे | 217 |
| 62 | मानवी हक्क व नैतिकता | प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख | 219 |
| 63 | पंचायतराज व्यवस्था आणि ग्रामपंचायतीतील महिला आरक्षण | काळे आर.के. | 222 |
| 64 | विविध क्षेत्रांतर्गत महिलांचे सबलीकरण | प्रा. सतिश मैलारी कटके | 226 |
| 65 | मानवी हक्कांची समीक्षा | डॉ. खडके ज्ञानेश्वर सुखदेव | 231 |
| 66 | मानवी हक्क : स्वरुप व स्वयंसेवी संस्था | प्रा. डॉ. महेश मोटे | 233 |
| 67 | महिला सबलीकरण | प्रा. डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण | 238 |
| 68 | मानव अधिकार आणि भारताची भूमिका | प्रा.डॉ.मुंडे एम.आर. | 241 |
| 69 | भारतातील पंचायतराज पद्धत | प्रा.डॉ. पोकळे के.जी. | 244 |
| 70 | शितयुध्दोत्तर काळात भारताचे परराष्ट्र धोरण | प्रा.डॉ. रामकिशन लोमटे | 248 |
| 71 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना | प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे डॉ. महादेव गव्हाणे | 251 |
| 72 | मानवी हक्क व मानवी हक्काची पायमल्ली करणारे घटक | प्रा.डॉ.रजनी अ. बोरोळे | 254 |


8\

# महिला सबलीकरण

**प्रा. डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण**
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.

**प्रस्तावना:**

२६ जानेवारी २०१८ रोजी भारतीय राज्यघटनेला ६८ वर्ष पूर्ण झाले. परंतू एवढ्या वर्षानंतरही महिला सक्षमीकरण झाले किंवा नाही हा चिंतनाचा विषय ठरतो. महिला सबलीकरण म्हणजे "महिलांनी स्वतः मधील सुप्त सामर्थ्य, क्षमता ओळखून आत्मविश्वासाने बुध्दीच्या सहाय्याने एक सुधारणात्मक प्रतिमा निर्माण करणे म्हणजे महिला सबलीकरण होय."

महिलांनी स्वतःच्या बुद्धीमत्तेला, नैसर्गीक शक्तीला फुलवणे स्वतःची ओळख व विचार स्वातंत्र्य अभिव्यक्ती व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य महिलांनी निर्माण करणे म्हणजे महिला सबलीकरण होय. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने विकासाच्या आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देणे म्हणजे महिला अधिकार होय.

राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी १९७२-९३ मध्ये ७२-७३ घटना तरतुदी करून महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षणसाठी तरतूदी आहे. परंतू महिलांच्या अनेक पदावर कार्यरत असणाऱ्या त्यांचे पती अधिकाराचा व पदाचा उपयोग करताना दिसून येत आहे. त्यावर प्रतिबंध होणे गरजेचे आहे. १९९२ मध्ये महिला हक्क व संरक्षणासाठी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना तर १९९३ मध्ये राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. १०८ वी घटना दुरूस्ती करून राज्यसभेने महिलांच्या राजकीय हक्काच्या उदासीनता कायमची संपवून टाकण्यासाठी ही घटना करण्याचे विधेयक नुकतेच पास करून यानुसार संसदेत व राज्य विधीमंडळातील सदस्य निवडीसाठी स्त्रीयांसाठी संधी उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच ३३ टक्के आरक्षण व ११० वी घटना दुरूस्ती करून पंचायत राज व्यवस्थेत विविध उपाय शहरी व ग्रामीण स्त्रीयांना ५० टक्के आरक्षण देण्याची विशेष तरतुद करण्यात आली आहे. याशिवाय तिसऱ्या चौथ्या व सहाव्या पंचवार्षिक योजनेत अनुक्रमे शिक्षण आरोग्य आणि नोकरीला प्राधान्य दिले आहे. यामुळे सर्वच क्षेत्रामध्ये महिला पुढे आलेले दिसुन येतात.

**महिला सबलीकरणाची उद्दिष्ट्ये :**

**१) स्त्री पुरूष समानता :-** सर्व मानवता जन्मतः समान आहेत असे मानून लिंगभेद न करता स्त्रियांचे पिढ्यान पिढ्या होत असलेले शोषण नष्ट झाले आहे.

**२) आर्थिक सामाजिक न्याय:-** ऐतिहासिक काळापासून स्त्रियांवर अन्याय होत आहे. त्यांना आर्थिक सामाजिक राजकीय अधिकार देण्यात आले नाहीत.

**३) स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे :-** आर्थिकदृष्ट्या त्यांना स्वावलंबी बनवणे व त्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

**४) राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग :-** राजकीय निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना कोणतेही स्थान नाही त्यात पुरूषांची मक्तेदारी दिसून येते.

**५) समानसंधी :-** राष्ट्र विकास ही केवळ पुरूषाची जबाबदारी आहे असे नाही तर स्त्रियांची तेवढीच जबाबदारी आहे म्हणून संविधानाने समान संधी दिली आहे.

**सक्षमीकरणाचे घटक :**

**१) सामाजिक सक्षमीकरण :-** सामाजिक बंधनामुळे खच्चीकरण होऊन महिला अबला बनलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या माध्यमातून अनेक समाज सुधारकांनी महिलांचे सामाजिक बंधन शिथिल करण्यास सुरूवात केली. यात महत्त्वाचे घटक स्वयं साहाय्यता बचत गट होय. त्यामुळे महिला एकत्र येऊन गावातील चावडीवर चर्चा करू लागल्या.

गावातल्या देवळात महिला सभा घेऊ लागल्या गटामुळे स्त्री पुरूष समानता प्रस्थापित होऊ लागली. आपल्या गटामार्फत चळवळी उभ्या करू लागल्या आहेत.

**(३) राजकीय दृष्ट्या सक्षमीकरण :-** स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून महिला राजकारणात सहभागी होत आहेत. गटामध्ये व्यवस्थापन, निर्णय, राखीव डावपेच याचे कौशल्य आत्मसात होऊ लागले. शिवाय नेतृत्व आणि कर्तव्य पार पाडण्याची संधी प्राप्त झाली आहे.

स्वयं-सहाय्यता बचत गटामुळे राजकीय दबाव गट निर्माण होत आहे. राजकीय व्यासपीठावर सन्मानाने वागविले जात आहे.



82

**महिला सबलीकरणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरचे प्रयत्न :-**

१) मानवी हक्क जाहिरनाम्यात समावेश :- डिसेंबर १९४८ ला युनोने जाहीर केलेल्या मानवी हक्क जाहीरनाम्यात महिला हक्कांचा समावेश केला गेला. कलम नं. २३ मध्ये समान कामासाठी समान वेतन तरतूद केली आहे.

२) १९४२ मध्ये युनोने पुरषाप्रमाणे स्त्रियांनाही राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा ठराव मंजुर केला त्यात मतदान करणे, निवडणूक लढविणे हे अधिकार मान्य केले.

३) महिला सबलीकरण वर्ष २००९ हे सरकारने महिला सबलीकरण वर्ष म्हणून जाहीर केले. ८ मार्च हा महिला दिवस म्हणून साजरा केला जातो.

४) आंतरराष्ट्रीय महिला आयोग :- महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी संस्था कार्य करते. 'आंतरराष्ट्रीय' परिषदा आयोजित करते.

५) लिंगभेदावर आधारित भेदभाव नष्ट करण्याचा ठराव १९७९ :- अनेक वर्षापासून स्त्रियांचे शोषण होत आहे. ते थांबविण्यासाठी हा ठराव १९७९ पास करून पुरूषांच्या बरोबरीने अधिकार मिळावा म्हणून या ठरावात तरतूदी करण्यात आल्या.

६) बिजींग महिला परिषद :- बिजींग येथे १९९५ ला आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले त्यात महिला विकास करण्यासाठी सूचना करण्यात आल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्य घटनेच्या कलम १४,१५,१६ व ३९ आणि कलम ४० मध्ये महिलांसाठी विविध सबलीकरणासाठी कायदेशीर तरतूदी केल्या आहेत.

संविधानात समतेच्या आधारावर विकासाची समान संधी मिळाल्याबरोबर शिक्षणातच नव्हे तर अर्थार्जन सेवा योजनातील संधीमुळे सक्षम होऊन सशक्तीकरणाची वाट चालू लागल्याची दिसून येते.

आज भारतात सर्वत्र आय.ए.एस. वकिल, न्यायाधिश, इंजिनियर्स, डॉक्टर, बिझीनेस मॅनेजमेंट मधील अधिकारी पायलट पासून ते ऑटोरिक्षा ड्रायव्हर्स इ. जागांवर स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिध्द केले.

**महत्वाचे महिलाभिमुख कायदे :-**

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने महिलांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी अनेक कायदे संमत केले आहेत.

(१) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा १९५६.

(२) मातृत्व लाभ कायदा १९६१

(३) हुंडाबंदी कायदा १९६१, १९८६ च्या दुरूस्तीसह

(४) स्त्रियांचे असभ्य प्रदर्शन (प्रतिबंध) कायदा १९८६.

(५) सती प्रथा प्रतिबंध कायदा १९८७

(६) राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९०.

(७) कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००४.

(८) बालविवाह बंदी कायदा २००६.

**महाराष्ट्र शासनाचे महिला करिता धोरण :-**

महाराष्ट्राने नेहमी आधुनिक व पुरोगामी विचारांचा पाठपुरावा केला आहे. स्त्रि शिक्षणाचे क्षेत्रात पायाभरणीचे कार्य करणाऱ्या म. फुले सारख्या समाज सुधारकांची जन्मभूमी : कर्मभूमी महाराष्ट्रातच आहे.

१) महिला बालकल्याण विभाग राज्य शासनाने महिला बालकल्याण हा एक स्वतंत्र विभाग निर्माण केला आहे.

२) हा विभाग महिला व लहान मुले यांच्या कल्याणाच्या योजना व कार्यक्रम यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या विभागावर आहे.

३) राज्य महिला आयोग मधील सबलीकरणानंतर चालना देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने १९९३ मध्ये राज्य महिला आयोगाची स्थापना केली आहे.

तथापि महिला सक्षमीकरणात बऱ्याच अडचणी येऊ शकतात.

**सक्षमीकरणात येणाऱ्या अडचणी :-**

**१) समाजाचा विरोध :-** महिलांचे परिवर्तन स्वीकारण्यास समाजातील पुरूष पुढारी लोक सहसा अनुकूलता दर्शवित नाहीत. कदाचित महिलांना संघटित करतांना समाजाचा विरोध होईल प्रसंगी संघर्ष होऊ शकतो.



83

**२) चारित्र्यावर ठपका :-** घरा बाहेरिल जाबाबदाऱ्या, कर्तव्य महिला करू लागतात अनेक मंडळींशी कामानिमित्त संपर्क, भेटीगाठी होतात. त्यातून महिलांच्या चारित्र्यावर आरोप केले जातात. महिला यशाची पायरी चढतांना अनैतिक संबंधाच्या अफवा फैलविल्या जातात जेणे करून महिलांनी घराबाहेर पडू नये.

**३) महिलांची स्वतःची मानसिकता :-** महिलांच सक्षमीकरण करण्यासाठी समाजात पोषक वातावरणाची आवश्यकता असते परंतू समाजात असे वातावरण अशक्य असते त्यामुळे महिला थोड्याफार अपयशांनी खचू शकतात.

**४) ग्रामीण, धार्मिक, रूढी परंपरांचा पगडा :-** या परंपरामुळे त्या घरात अडकून राहतात जगाचे ज्ञान त्यांना प्राप्त होत नाही त्यामुळे सबलीकरण होत नाही.

**निष्कर्ष :-** थोडक्यात आजच्या स्त्रिने आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. ती आपला स्वाभिमान टिकविण्यासाठी घरातून बाहेर जावून अर्थार्जन करीत आहे. ती आपल्या कुटूंबाचा जीवनस्तर उंचावण्यासाठी आणि घरगूती गरजा पूर्ण करण्यासाठी काम करीत आहे कुटीर उद्योग बचतगट, चालविल्यास महिला हया आर्थिकदृष्ट्या सबल सक्षम बनू शकतात.

भारतीय घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक राजकीय परिस्थितीनुसार महिलांच्या कार्याच्या कक्षा रूंदावत राहिल्या. मानवी हक्कांची सुरक्षा करण्यासाठी राष्ट्रीय हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. ते सर्व खरे असले तरी खऱ्या अर्थाने समाजामध्ये स्त्रियांच्या मानवी हक्काबद्दल जाणीव निर्माण झालेली नाही. स्त्रियांना जर स्वातंत्र्यानंतरही माणुसकीची वागणूक दिली जात नसेल तर समाजाची प्रगती होऊ शकणार नाही.

**संदर्भ :-**

१) महिला सबलीकरण स्वरूप व समस्या - डॉ. कांकरिया राजेंद्र, डॉ. गोटे.
२) महिलांचे सबलीकरण दारिद्रय निर्मूलन व स्वयंसाहाय्यता गट- श्रीमती दासगुप्ता कविता, श्री. देसाई रविंद्र.
३) व्यावसायिक समाज कार्य विचारधारा व इतिहास, फडके प्रकाशन केल्हापूर - डॉ. प्राजक्ता टाकसाळे.
४) पंचायतराज आणि सामुहिक विकास श्री साईनाथ प्रकाशन नागपूर - डॉ. श.गो. देवगावकर.
५) सामाजिक न्यायासाठी कायदे - डॉ. ए.पी. पिल्लई.
६) मानवी हक्क व समानता निराली प्रकाशन - नंदकुमार भारंबे
७) ह्युमन राईटस इन इंडिया - बी.पी. सिंग सेहगल.
८) आमचे व्यासपीठ स्वयंसाहाय्यता समूह - डॉ. घोरपडे आश्विनी, शिवताई सुरेश.

Sawant K.D.
Lecturer in History
Mahila College, Georai.